ePaper

स्ट्राँग रुमबाहेर अजितदादा गटाबरोबरच शिंदे गटाचाही जागता पहारा

| वर्ष - 9 | अंक -106 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

www.mahaenews.com | बुधवार, दि. 10 डिसेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- हार्दिक पंड्याची धुव्वाधार खेळी!
- कटकमध्ये तिलक वर्माचा सुपरमॅन शो!
- महाराष्ट्रामध्ये निवडणूक आयोग नाही!
- 'इंडिगो'ची सेवा पुन्हा पूर्ववत


### शिंदेंकडून मुख्यमंत्र्यांचं भरभरून कौतुक

### अमिताभला बिग बी तर

# देवेंद्रजी सभागृहातले BIG D!

## नाराजीनाट्यानंतर पहिल्यांदाच एकनाथ शिंदे यांनी सार्वजनिक मंचावर फडणवीसांचे गायले गुणगान



| नागपूर | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**राजकारणातले मतभेद, तणाव आणि आरोप-प्रत्यारोप यांच्या सावलीत गेल्या काही महिन्यांपासून सरकार चालत असलं, तरी याच सरकारचे दोन प्रमुख चेहरे — मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे — यांनी एकमेकांवरील कौतुकाचा वर्षाव करत राजकीय वातावरण अधिकच रंगतदार केलं. नागपुरातील एका पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात दोघांचा समतोल संवाद आणि कौतुकाची देवाणघेवाण राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली.**

कार्यक्रमाच्या मुख्य भाषणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देवेंद्र फडणवीसांची करामत, तडफ आणि नेतृत्वगुणांची मोठ्या शब्दांत स्तुती केली. त्यांच्या मुखातून बाहेर पडलेले शब्द प्रेक्षकांच्या टाळ्यांचा कडकडाट घेऊन आले —

**"अमिताभ बॉलिवूडमधला बिग बी असेल तर देवेंद्रजी या सभागृहातील BIG D आहेत."**

पुढे 'D' ची व्याख्या सांगताना शिंदेंनी मुद्दामच सस्पेन्स निर्माण केला. "D म्हणजे वेगळा अर्थ काढू नका... हा D म्हणजे Devotion, Dedication, आणि Determination चा," अशा शब्दांत शिंदेंनी फडणवीसांच्या कार्यशैलीचं सार मांडत त्यांचं कौतुक गगनात पोहोचवलं.

राजकारणातील कटुता विरघळत मैत्री जिवंत असल्याचं दाखवणारा हा प्रसंग ठरला.

**नाराजीनंतर पहिल्यांदाच**

मागील काही महिन्यांमध्ये शिंदे आणि फडणवीस यांच्यातील मतभेद स्पष्टपणे जाणवत होते. शासकीय निर्णयांपासून महत्त्वाच्या समित्यांच्या प्रश्नावर दोघांमध्ये मतभिन्नता असल्याची चर्चा होती. मात्र नागपूरमधील या कार्यक्रमाने त्या कटुत्वावर थोडी मलमपट्टी ल्याचं चित्र उभं केलं.

**विरोधकांना 'हुडहुडी' भरवणारा 'हुडी किस्सा'**

कार्यक्रमात शिंदेंनी जुन्या आठवणीही चाळवून प्रेक्षकांना हसवलं. गुवाहाटीतील पक्षबदल घडलेल्या निर्णायक दिवसांची आठवण करून देताना ते म्हणाले. "त्या दिवसांत देवेंद्रजी मला हुडी घालून भेटायला यायचे. पण त्यांच्या त्या हुडीने विरोधकांना 'हुडहुडी' भरली होती!" सभागृहात हास्याचा स्फोट झाला. राजकारणातील कठोर प्रसंग हलक्याफुलक्या शैलीत सांगत शिंदेंनी वातावरण रंगतदार करून टाकलं.

**"आमचा लढा विचारांसाठी होता"**

फक्त कौतुक नव्हे; शिंदेंनी आपली भूमिका पुन्हा अधोरेखित करण्याची संधीही साधली. विचारधारेवर सुरू असलेल्या वादाच्या संदर्भात त्यांनी स्पष्ट शब्दांत आपली बाजू मांडली — "आमचा लढा हा लोकशाहीच्या विरोधात चाललेल्या कामाविरोधात होता. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना पायदळी तुडवण्याविरोधात होता." शब्दांमध्ये ठाम भूमिका, चेहऱ्यावर मैत्रीपूर्ण हास्य — अशा संतुलित सुरात त्यांनी संदेश पोहोचवला.

### कार्यक्रमात रंगलेली शायरी

फक्त कौतुकच नाही तर एकनाथ शिंदे यांनी शेरोशायरीतूनही मैत्री आणि निष्ठेचा संदेश दिला.
त्यांची शायरी —

**"हम वो नहीं जो दिल तोड देंगे,**
**थामकर हाथ, फिर साथ छोड देंगे,**
**पानी के तरह है दोस्ती हमारी,**
**कोई कितना भी चाहे हम जुदा नहीं होंगे..."**

या ओळीने संपूर्ण सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. राजकीय मैत्रीतली ही कविताई गोडी प्रेक्षकांनीही मनापासून अनुभवली.

**फडणवीसांची 'शतक' कॉमेंट!**

कौतुकाची देवाणघेवाण फक्त शिंदेंच्या बाजूनंच नाही. देवेंद्र फडणवीस यांनीही व्यासपीठावरून शिंदेंना दाद देत वातावरण अधिक सुखद केलं. भाषणाची सुरुवात करताना त्यांनी शिंदेंचा 'क्रिकेटिंग' अंदाजात उल्लेख केला —

**"मंचावर उपस्थित असलेले लोकप्रिय उपमुख्यमंत्री...** ज्यांनी नुकतंच चौकार-षटकार मारत आपलं 'शतक' पूर्ण केलं आहे — एकनाथ शिंदे!"

हास्य, कौतुक आणि परस्पर सन्मानाने भरलेला हा 'तक्त्यावरील खेळ' प्रेक्षकांनी हसत-टाळ्यांनी स्वागत केला.

**सरकारला नवी दिशा?**

या कार्यक्रमाने एक महत्त्वाचा राजकीय संदेश दिला — सरकार चालवण्यासाठी एकोपा, संवाद आणि विश्वास महत्वाचा असतो आणि तो अद्याप कायम आहे. गेल्या काही काळात "मतभेद वाढले", "राजीनाम्याची भाषा वाढली", "दोन्ही पक्षांत दरी निर्माण झाली" अशा बातम्या सतत झळकत होत्या. मात्र नागपूरमधील हा मैत्रीपूर्ण संवाद तणावानंतरची 'सकारात्मक वळण' देणारा ठरला.

**राजकीय अर्थ काय?**

विश्लेषकांच्या मते हे कौतुक फक्त शब्दांतले नाही.भविष्यातील राजकीय समीकरणं, राज्याचा सत्ताबल आणि निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोघेही एकत्र असल्याचा स्पष्ट संकेत या कार्यक्रमाने दिला. विरोधकांनाही राजकीय 'हुडहुडी' देणारा हा संदेश ठरू शकतो.

**फडणवीसांविषयी अद्वितीय कौतुक**

शेरोशायरीतून मैत्रीचा सन्मान
'हुडी किस्सा' उघडून वातावरण हलकं
फडणवीसांची थट्टेमिश्रित प्रत्युत्तरं
सत्तेतील तणावाऐवजी ऐक्याचा दाखला

राज्यातील राजकारण सतत बदलांच्या कॅनव्हासवर रंगत असतं. पण त्या बदलांच्या मध्यभागी आज नागपूरमध्ये रंगलेला 'BIG D आणि BIG S' चा संवाद हे सरकारच्या राजकीय कथेतील उत्सुकतेचं नवं पान ठरलं आहे.

## पुणे पोलीस अलर्ट मोडवर

## गोव्यातील दुर्घटनेनंतर रेस्टॉरंट चालकांना सूचना

# अग्नीशमन दल अलर्ट मोडवर!

### गोव्यातील दुर्घटनेत २५ जणांचा मृत्यू

। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**गोव्यातील नाइट क्लबमध्ये झालेल्या भीषण दुर्घटनेत २५ जणांचा मृत्यू झाल्यानंतर पुण्यातील पब, रेस्टॉरंट तसेच हॉटेल चालकांना योग्य उपाययोजनांबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तर, आपत्कालीन उपाययोजनांची तपासणी करावी, असे आदेशही अग्निशमन दलाकडून देण्यात आले आहेत. आगामी नाताळ तसेच थर्टीफस्टनिमित्त होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिस तसेच अग्निशमन दलाकडून विविध पब, रेस्टॉरंट, हॉटेल चालक यांना आपत्कालीन उपाययोजना तसेच सुरक्षेसंदर्भात सूचना देण्यात येणार आहेत.**

दोन दिवसांत विविध सूचनांचे परिपत्रक संबंधितांना पाठविण्यात येईल,' अशी माहिती मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे यांनी दिली.

पुण्यात देखील अनेक हॉटेल्स आणि रेस्टॉरंटमधील



स्थिती पाहता फायरच्या उपाययोजना तसेच बाहेर पडण्यासाठी मार्ग नसल्याचे दिसते. अनेक बार तर पार्किंगच्या व्यवस्था तसेच मार्गदर्शक सूचनांना फाटा देऊन चालविले जात असल्याचे वास्तव आहे. त्यामुळे आता पोलिस व अग्निशमन दलाकडून पाहणी करण्यास सुरूवात करण्यात आली आहे.'शहरातील पब, रेस्टॉरंट, बारमध्ये प्रवेश करण्यासाठी तसेच बाहेर पडण्यासाठी असलेल्या मार्गांची पाहणी करणे गरजेचे आहे. आग किंवा एखादी अनुचित घटना घडल्यास ग्राहकांना त्वरित बाहेर पडण्याचे मार्ग उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. पब, रेस्टॉरंट, बारमधील अग्निरोधक यंत्रणा कार्यान्वित आहे का नाही,

याची पाहणी करणे गरजेचे आहे. एखादी अनुचित घटना घडल्यास त्वरित केल्या जाणाऱ्या उपाययोजनांबाबत पब, रेस्टॉरंट, बारचालकांनी संबंधित कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहोचेपर्यंत मदतकार्य सुरू करण्याच्या दृष्टीने त्यांना प्रशिक्षित करायला हवे. यानिमित्ताने येथील कर्मचाऱ्यांना आवश्यक ते प्रशिक्षणही अग्निशमन दलाकडून दिले जाईल. आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात सराव तसेच कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणेही गरजेचे आहे.',

### मार्गदर्शक सूचनांना फाटा

त्यामुळे आता पोलिस व अग्निशमन दलाकडून पाहणी करण्यास सुरूवात करण्यात आली आहे.'शहरातील पब, रेस्टॉरंट, बारमध्ये प्रवेश करण्यासाठी तसेच बाहेर पडण्यासाठी असलेल्या मार्गांची पाहणी करणे गरजेचे आहे. आग किंवा एखादी अनुचित घटना घडल्यास ग्राहकांना त्वरित बाहेर पडण्याचे मार्ग उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. पब, रेस्टॉरंट, बारमधील अग्निरोधक यंत्रणा कार्यान्वित आहे का नाही, याची पाहणी करणे गरजेचे आहे.

असे पोटफोडे यांनी नमूद केले.

गोव्यातील दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर पब, रेस्टॉरंट चालकांनी सुरक्षाविषयक उपाययोजनांची पाहणी करणे गरजेचे आहे. अनुचित प्रकार घडल्यास त्वरित बाहेर पडण्यासाठी ग्राहकांना मार्ग उपलब्ध करून द्यायला हवा. गोव्यातील नाइट क्लबमध्ये झालेल्या भीषण दुर्घटनेत २५ जणांचा मृत्यू झाल्यानंतर पुण्यातील पब, रेस्टॉरंट तसेच हॉटेल चालकांना योग्य उपाययोजनांबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तर, आपत्कालीन उपाययोजनांची तपासणी करावी, असे आदेशही अग्निशमन दलाकडून देण्यात आले आहेत.

आगामी नाताळ तसेच थर्टीफस्टनिमित्त होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिस तसेच अग्निशमन दलाकडून विविध पब, रेस्टॉरंट, हॉटेल चालक यांना आपत्कालीन उपाययोजना तसेच सुरक्षेसंदर्भात सूचना देण्यात येणार आहेत. दोन दिवसांत विविध सूचनांचे अशी माहिती मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे यांनी दिली. पुण्यात देखील अनेक हॉटेल्स आणि रेस्टॉरंटमधील स्थिती पाहता फायरच्या उपाययोजना तसेच बाहेर पडण्यासाठी मार्ग नसल्याचे दिसते. अनेक बार तर पार्किंगच्या व्यवस्था तसेच मार्गदर्शक सूचनांना फाटा देऊन चालविले जात असल्याचे वास्तव आहे.

# मावळातील उद्योजकांची दिशाभूल?

## स्थानिक दलाल अन् PMRDA अधिकाऱ्यांविरोधात आ.शेळके आक्रमक

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मावळ तालुक्यात गुंतवणुकीसाठी येणाऱ्या मल्टिनॅशनल कंपन्यांची काही दलालांकडून कोट्यवधी रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचे धक्कादायक प्रकरण उघडकीस आले. याबाबत गंभीर आरोप आमदार सुनील शेळके यांनी नागपूर हिवाळी अधिवेशनात केले आहेत.**

हुंदाईसारखी कोरियन कंपनी महाराष्ट्रात आणणाऱ्या महायुती सरकारचा उद्देश रोजगारनिर्मिती असताना, काही दलालांनी कंपनीच्या व्हेंडरना



बेकायदेशीर व फसवे दस्तऐवज दाखवून मिळकतीची विक्री करून आंतरराष्ट्रीय कंपनीलाच आर्थिक गंडा घातला, असे त्यांनी स्पष्ट केले.

फसवणुकीत सामील दलालांनी खोट्या मोजणी नकाशावर बांधकाम परवानगी घेतल्याचे, कोणताही पूर्णत्वाचा दाखला (OC) न घेता प्रकल्पांची विक्री केल्याचे, शिवाय वनीकरण झोनमध्ये बेकायदेशीर बांधकाम करून हजारो ब्रास उत्खननही केल्याचे समोर आले आहे. अशा प्रकारे अनेक कंपन्यांची फसवणूक झाल्याने, संबंधित दलालांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी आमदार शेळके यांनी मांडली.

### कठोर कारवाईची मागणी

ठाम पाठीशी उभा राहिलो आहे. कोणत्याही कंपनीचा ठेका घेतलेला नाही," असे सांगत त्यांनी स्वतःवरील आरोपांनाही उत्तर दिले. पुढे ते म्हणाले की, "मावळ तालुक्यात येणाऱ्या उद्योगांशी फसवणूक करणाऱ्या दलालांना आम्ही सुट्टी देणार नाही," असा कठोर इशारा देत आमदार शेळके यांनी या सर्वांवर तातडीने गुन्हे दाखल करून कठोर कारवाईची मागणी केली आहे.याचदरम्यान, या गंभीर फसवणूक प्रकरणाची सविस्तर माहिती देण्यासाठी आमदार सुनील शेळके यांनी नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन प्रकरणाची संपूर्ण माहिती सादर केली.

पीएमआरडीएनेही या प्रकरणांवर नोटीस बजावल्यानंतर या व्यवहारांमधील धांदली अधिक स्पष्टपणे बाहेर आली आहे. मावळातील एमआयडीसी परिसरात वाढत्या गुंतवणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक मोठ्या कंपन्या येथे व्यवसाय उभारण्यास इच्छुक आहेत. मात्र काही दलाल बनावट झोन दाखले, नकाशे बदलणे, चुकीची परवानगी दाखवणे, आणि गुंतवणूकदारांना दिशाभूल करून मिळकतीची विक्री करीत असल्याचे शेळके यांनी निदर्शनास आणले.

## नऊ वर्षीय मुलीचा मृत्यू : गरोदर बहिण गंभीर जखमी, आठवडाभरात दुसरी घटना

# भरधाव पीएमपीएल बसने सख्ख्या बहिणींना चिरडले!

## तळवडेतील भीषण अपघातानंतर संतप्त नागरिकांची बसवर दगडफेक

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आठवडाभरापूर्वी मद्यधुंद बसचालकाने तीन भावंडांना चिरडत दोन बालिकांसह चिमुकल्या मुलाचा जीव घेतला, त्या जखमी आठवणी ताज्या असतानाच तळवडे परिसरात पुन्हा एकदा पीएमपीएल बसने बळी घेतला आहे. मंगळवारी (दि. ९) दुपारी तीनच्या सुमारास भरधाव बसने रस्ता ओलांडणाऱ्या दोन सख्ख्या बहिणींना जोरदार धडक दिली. या अपघातात सुधा बिहारीलाल वर्मा (वय ९) हिचा जागीच मृत्यू झाला, तर तिची गरोदर बहीण राधा राम वर्मा (वय २५) गंभीर जखमी झाली. अपघातानंतर संतप्त नागरिकांनी बसवर दगडफेक करत काचा फोडत रोष व्यक्त केला.**




अपघात तळवडेतील ज्योतिबानगर येथे घडला. धडक इतकी जबरदस्त होती की सुधाचा जागीच मृत्यू झाला, तर राधाला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलं. तिच्या पोटात वाढत असलेल्या बाळाच्या सुरक्षिततेची चिंता अधिक वाढली आहे. नागरिकांनी ही घटना पाहून आक्रोश व्यक्त केला आणि काही काळ वाहतूक विस्कळीत झाली.

**गावाहून बहीण बोलावली आणि...**

राधा वर्मा ही तळवडे येथील एका वर्कशॉपमध्ये पतीसह काम करते. ती गर्भार असल्याने बाळंतपणासाठी लहान बहीण सुधाला गावाहून बोलावले होते. दुपारचे जेवण करून दोघी घराकडे परत येत असताना हा भीषण अपघात घडला. जीव वाचवण्यासाठी उसंतही न मिळता सुधाचा जीव गेला आणि राधा मात्र गंभीर जखमी अवस्थेत जीवन-मरणाच्या सीमेवर पोहोचली.

**चालक अटकेत**

धडक देऊन अपघात घडवणाऱ्या पीएमपीएल बस चालक किरण भटू पाटील (वय ३५, रा. चिखली) याला घटनास्थळीच पोलिसांनी ताब्यात घेतलं. देहूरोड ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विक्रम बनसोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**संतप्त नागरिकांचा संताप, बस सेवेवर टोक**

अपघातानंतर परिसरात तणाव निर्माण झाला. नागरिकांनी संतापाच्या भरात बसवर दगडफेक करून काचा फोडल्या. बेफाम बसचालकांमुळे सातत्याने वाढणारे अपघात, वाहतूक नियमांचे उल्लंघन, सुरक्षिततेकडे पीएमपीएलचे दुर्लक्ष — या सर्वांविरोधात रोष उफाळून आला. “बसचा वेग, चालकांची बेपर्वाई आणि वर्दळीच्या रस्त्यावर सतत अपघात... प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत” असे मत स्थानिक रहिवाशी व्यक्त करत आहेत.

**सुरक्षेची मागणी तातडीची**

पीएमपीएल बसमार्गावर गेल्या काही महिन्यांपासून अपघातांचं प्रमाण चिंताजनक पातळीवर वाढलं आहे. असा आरोप नागरिकांकडून होतोय.

**चालक वेगमर्यादेचं पालन करत नाहीत**

वाहतूक नियमनाची उघडपणे पायमल्ली. बस थांबे आणि पादचारी सुरक्षा मार्गांची अपूरे व्यवस्था म्हणूनच या मार्गावर कडक नियम, ब्रेकर, सिग्नल आणि वाहतूक नियोजनाची मागणी जोर धरत आहे.

### बस सेवा बंद, प्रवाशांची गैरसोय

तोडफोडीत बसचे मोठे नुकसान झाल्याने काही काळ तळवडे-निगडी मार्गावरील बस सेवा थांबवण्यात आली. परिणामी प्रवाशांना प्रचंड गैरसोय सहन करावी लागली. विशेषतः शालेय विद्यार्थी, नोकरीला जाणारे कर्मचारी आणि ज्येष्ठांचीही मोठी अडचण झाली. परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतर वाहतूक पुन्हा सुरू करण्यात आली आणि नुकसानग्रस्त बस देहूरोड पोलिस ठाण्यात नेण्यात आली.

# ओल्यापासून सीएनजी, तर सुक्यापासून वीजनिर्मिती

## पिंपरी महापालिकेची घरगुती कचऱ्यापासून बायो-सीएनजी प्रकल्पाची निविदा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: लोकसंख्या झपाट्याने वाढत असल्याने दिवसेंदिवस कचऱ्याचे प्रमाणही वाढत आहे. भविष्यात कचऱ्याची समस्या गंभीर होऊ नये म्हणून त्याची विल्हेवाट लावण्यासाठी महापालिकेकडून घरगुती ओल्या कचऱ्यापासून बायो-सीएनजी (जैव-मिथेनेशन) प्रकल्प उभारण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. तर, दररोज २७ मेगावॅट वीजनिर्मितीच्या (वेस्ट टू एनर्जी) प्रकल्पाचा आराखडा तयार झाला .**



### २७ मेगावॅट क्षमतेच्या ‘वेस्ट टू एनर्जी’चा आराखडा तयार

### बायो-सीएनजी प्रकल्पाची निविदा प्रसिद्ध

पिंपरी-चिंचवड शहरभरातून दररोज १३०० ते १४०० टन कचरा मोशी कचरा डेपोत जमा होतो. मोशी कचरा डेपोत गेल्या ३६ वर्षांपासून कचरा साचला आहे. एकूण ८१ एकर क्षेत्रातील डेपोत कचऱ्याचे डोंगर उभे झाले आहेत. तो कचरा बायो-मायनिंगद्वारे कमी केला जात आहे. ‘वेस्ट टू एनर्जी द्वारे दररोज १४ मेगावॅट वीजनिर्मिती होत आहे. त्यासाठी दररोज ७०० टन सुका कचरा जाळला जात आहे. या निर्माण होणाऱ्या राखेतून खत तयार केले जात आहे. हा प्रकल्प यशस्वी ठरल्याने महापालिकेने आणखी एक ‘वेस्ट टू एनर्जी’ प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला आहे. तो नवा प्रकल्प २७ मेगावॅट क्षमतेचा असणार आहे. त्यात दररोज एक हजार टन सुका कचरा जाळला जाणार आहे.

हा प्रकल्प ‘बीओटी’ (बांधा, वापरा, हस्तांतरित करा) तत्त्वावर उभारला जाणार आहे. त्यासाठी एक हजार ५० कोटींचा खर्च अपेक्षित आहे. त्यासाठी एक हजार ५०० टन क्षमतेचा मटेरियल रिकव्हरी फॅसिलिटी (एआरएफ) केंद्र उभारले जाणार आहे. त्या प्रकल्पाचा आराखडा तयार झाला असून, तेथीलही वीज महापालिकेस अल्पदरात प्राप्त होणार आहे. प्रकल्पासाठी महापालिकेचा १५० ते २०० कोटी रुपयांचा हिस्सा असणार आहे. या प्रकल्पासाठी केंद्रराज्य शासनाने निधी उपलब्ध करून द्यावा म्हणून पाठपुरावा केला जात आहे.

मोशी डेपोत दररोज ४०० ते ४५० टन जमा होणाऱ्या घरगुती ओल्या कचऱ्यापासून बायो-सीएनजी प्रकल्प उभारण्यात येत आहे. त्याची निविदा पर्यावरण अभियांत्रिकी विभागाने नुकतीच प्रसिद्ध केली आहे. हा प्रकल्प प्रतिदिन ३७५ टीपीडी क्षमतेचा असणार आहे. या प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून ‘स्वच्छ भारत-२.०’ अंतर्गत ६७ कोटी ५० लाख रुपयांचे अनुदान मंजूर झाले आहे. तो प्रकल्प टप्प्याटप्प्याने ५०० टीपीडी क्षमतेपर्यंत वाढविण्यात येणार आहे. या दोन प्रकल्पांमुळे घरगुती ओला कचरा, तसेच सुक्या कचऱ्याची समस्या सुटण्यास साहाय्य होणार असल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे.

> “ घरगुती ओल्या कचऱ्यापासून बायो-सीएनजी निर्मितीचा प्रकल्प मोशी कचरा डेपोत उभा करण्यात येणार आहे. त्यासाठी नुकतीच निविदा प्रसिद्ध केली आहे. त्या प्रकल्पास केंद्र शासनाकडून ६७ कोटी ५० लाख रुपयांचे अनुदान मिळणार आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरू करण्यात येईल. तसेच २७ मेगावॅट वीजनिर्मिती प्रकल्पाचा आराखडा तयार केला आहे. प्रकल्पाच्या निधीसाठी केंद्र व राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
>
> **-संजय कुलकर्णी,** मुख्य अभियंता, महापालिका

# सुसंस्कृत राजकारणाची जबाबदारी कुणाची ?



भूमिका

**ज्या बिहारमध्ये राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाची समस्या गंभीर होती, तिथे आता अनेक वर्षांच्या अथक प्रयत्नानंतर राजकीय स्वच्छता आणि स्थिरतेच्या दिशेने सुधारणा होताना दिसत आहेत. याउलट, पुरोगामी आणि सुसंस्कृत महाराष्ट्रात मात्र गुन्हेगारी प्रवृत्तींना खुले आम तिकीट देऊन त्यांना बळ दिले जात आहे.**




हे चित्र महाराष्ट्राच्या राजकीय नेतृत्वासाठी अत्यंत लाजिरवाणे आहे, कारण यामुळे आपण आपली उच्च राजकीय परंपरा गमावण्याच्या मार्गावर आहोत.महाराष्ट्र हे राज्य नेहमीच सुसंस्कृत राजकारण, वैचारिक मतभेद आणि प्रगल्भ संसदीय परंपरांसाठी ओळखले गेले आहे. येथील राजकीय संस्कृतीला एक निश्चित उंची होती आणि जनमताचा आदर ही राज्याच्या नेतृत्वाची मूलभूत ओळख होती. मात्र, अलिकडच्या काळात निवडणुकीच्या प्रक्रियेत आणि सार्वजनिक जीवनात वाढलेली गुन्हेगारी आणि बळाचा वापर पाहता, महाराष्ट्राच्या राजकीय भवितव्याबद्दल एक गंभीर प्रश्न उभा राहिला आहे: महाराष्ट्र खरोखरच बिहारच्या वाटेवर तर जात नाहीये ना? ऐतिहासिकदृष्ट्या, बिहारच्या राजकारणाचे अनेक वर्षे गुन्हेगारीकरण झाले होते, ज्यामुळे तेथील प्रशासन आणि विकासाला मोठा फटका बसला. आज जेव्हा बिहारसारख्या राज्यात राजकीय स्वच्छतेसाठी प्रयत्न होत असताना, महाराष्ट्रात मात्र स्थानिक निवडणुकीपासून ते मोठ्या निवडणुकींपर्यंत अराजकतेचे आणि गुंडगिरीचे दर्शन घडत आहे, ही चिंताजनक बाब आहे. महाराष्ट्रात घडणाऱ्या काही घटना अत्यंत चिंताजनक आहेत, कारण त्या केवळ निवडणुकीचे नियम मोडत नाहीत, तर लोकशाहीच्या मूळ मूल्यांचे विडंबन करतात. लोकशाहीतील मतदाराचा हक्क आणि उमेदवाराची स्पर्धा करण्याची संधी या दोन्ही गोष्टींवर थेट हल्ला होत आहे. काही ठिकाणी विरोधी पक्षाच्या किंवा अपक्ष उमेदवारांना उमेदवारी अर्ज भरू न देणे, त्यांना धमकावणे किंवा पळवून लावणे, यासारखे प्रकार घडत आहेत.

बिनविरोध निवडणुकीचा विकृत अर्थ लावत, ही मंडळी लोकशाही प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाच्या टप्प्यावरच हल्ला करत आहेत. याशिवाय, बोगस मतदान करणे, पैसे किंवा वस्तूंचे आमिष दाखवणे किंवा मतदारांना थेट धमकावून आपल्या बाजूने मतदान करण्यास भाग पाडणे, या घटना महाराष्ट्राच्या सुसंस्कृत परंपरेला 'नासवून' टाकण्याचा धोका निर्माण करत आहेत. यामुळे निवडणुकीचा निकाल जनतेच्या मतावर नव्हे, तर बाहुबलावर ठरवण्याचा प्रयत्न होत आहे, हे स्पष्ट दिसते. या गुन्हेगारी प्रवृत्तींना राजकारणात बळ देण्याचे सर्वात मोठे पाप हे प्रस्थापित राजकीय पक्ष करत आहेत. 'कसेही करून निवडणूक जिंकायची' या एकमेव ध्येयापायी पक्ष नेतृत्व गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या आणि भ्रष्ट चारित्र्याच्या लोकांना तिकीट देत आहे. अशा व्यक्तींची मतदारसंघात दहशत असल्याने, पक्ष नेतृत्वाला वाटते की विजय निश्चित आहे; पण, यामुळे तात्काळ विजय मिळत असला तरी, दीर्घकाळात पक्ष आणि राज्याची संस्कृती क्षीण होते. गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या लोकांना बळ दिल्यास हीच मंडळी राज्याला आणि प्रशासनाला वेठीस धरतील, यात शंका नाही. या संदर्भात सर्वात मोठी विडंबना ही आहे की, ज्या बिहारमध्ये राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाची समस्या गंभीर होती, तिथे आता अनेक वर्षांच्या अथक प्रयत्नानंतर राजकीय स्वच्छता आणि स्थिरतेच्या दिशेने सुधारणा होताना दिसत आहेत. याउलट, पुरोगामी आणि सुसंस्कृत महाराष्ट्रात मात्र गुन्हेगारी प्रवृत्तींना खुले आम तिकीट देऊन त्यांना बळ दिले जात आहे. हे चित्र महाराष्ट्राच्या राजकीय नेतृत्वासाठी अत्यंत लाजिरवाणे आहे.

कारण यामुळे आपण आपली उच्च राजकीय परंपरा गमावण्याच्या मार्गावर आहोत. राजकीय पक्षांच्या नेतृत्वाने कठोर निर्णय घेऊन ही परिस्थिती त्वरित बदलणे आवश्यक आहे. राजकारण हे सेवा आणि लोककल्याणाचे माध्यम आहे, दहशतीचे नाही. महाराष्ट्र बिहारच्या वाटेवर जाण्यापासून रोखायचे असेल, तर निवडणुकीची पारदर्शकता राखणाऱ्या स्वायत्त संस्थांना (निवडणूक आयोग) बळ देणे गरजेचे आहे; परंतु, त्याहून महत्त्वाचे म्हणजे, प्रस्थापित पक्षांनी स्वच्छ चारित्र्याच्या, सामाजिक बांधिलकी असलेल्या आणि कायद्याचे पालन करणाऱ्या व्यक्तींना तिकीट देणे, ही त्यांची नैतिक जबाबदारी आहे. निवडणूक जिंकण्यापेक्षा राजकीय नीतिमत्ता जपणे महत्त्वाचे आहे.

## प्रासंगिक »

# तिरकी चाल !

***भारत-पाकिस्तान तणावामुळे ही संघटना जवळजवळ निरुपयोगी ठरली आहे. १९४७ पासून दोन्ही देशांनी तीन युद्धे लढली आहेत.***

दक्षिण आशियायी देशांच्या संघटना असलेल्या 'सार्क' देशांच्या समूहात भारताच्या व्यूहनीतीमुळे पाकिस्तानचा समावेश होऊ शकला नाही. त्यामुळे आता पाकिस्तान सार्कमधून भारताला वगळून आशियाचा 'पोलिस' बनू इच्छितो. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव कायम आहे. पाकिस्तानला भारताने इतका धडा शिकवला आहे, की त्याच्या मनात फक्त एकच गोष्ट आहे, भारताविरुद्ध कट कसा रचायचा?

'सार्क'मधून भारताला वगळण्याची किंवा 'सार्क'सारखे नवीन गट तयार करण्याची पाकिस्तानला घाई आहे. पाकिस्तानने या खेळात चीनलाही समाविष्ट केले आहे आणि बांगला देशलाही चिथावणी दिली आहे. पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादमध्ये 'इस्लामाबाद कॉन्क्लेव्ह'ला संबोधित करताना परराष्ट्रमंत्री इशाक दार म्हणाले, की 'सार्क'ला 'ओलिस' ठेवता येत नाही.

समाजातील वंचित, मागास अशा प्रत्येक घटकाशी जोडले गेलेले बाबा तरुणांशीही प्रचंड कनेक्टेड होते. बाबांची अफाट एनर्जी बघून आम्हा तरुणांना लाज वाटायची. तरुण मुलांसाठी कुठं शिबिर, कुठं कार्यक्रम असला आणि बाबांना ते कळलं की बाबा जीन्स, कुर्ता आणि शूज घालून तरुणांशी गप्पा मारायला लगेच हजर.

# बाबा : संघर्ष आणि सुगंध

आपल्या प्रत्येक व्याख्यानाची सुरुवात बाबा नेहमी महात्मा फुले ह्यांच्या 'सत्य सर्वांचे आदी घर । सर्व धर्मांचे माहेर', या अखंडानं करायचे. त्यांच्या आवाजानं एक वेगळीच ऊर्जा अंगात संचारायची. बाबा रोज सकाळी साधारण दहा- अकरा वाजण्याच्या दरम्यान 'हमाल पंचायत'च्या ऑफिसला येत असत. हे ठिकाण म्हणजे प्रत्येक कष्टकऱ्याच्या समस्यांच्या उपायांचं ठिकाण. टेम्पोचालक, हमाल, कागद-काच-पत्रावेचक, मोलकरणी ह्यांच्यापासून ते दिग्गज नेते, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार असे सगळे मदत, मार्गदर्शन आणि महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यासाठी बाबांना भेटायला यायचे. भेटायला आलेल्या प्रत्येक माणसाच्या हातात बाबा आपल्या बागेतून सोबत आणलेलं सोनचाफ्याचं फूल टेकवायचे. त्रस्त माणूस त्या सुगंधानंच शांत व्हायचा. चाफ्याच्या फुलाप्रमाणे बाबा सर्वसामान्य माणसांना फुलण्याचं, बहरण्याचं बळ द्यायचे. टिंबर मार्केटच्या 'हमाल



पंचायत'च्या ऑफिसच्या पाठीमागेच बाबांनी लायब्ररी उभारली आहे. या लायब्ररीतच आम्ही पोरं 'अभ्यासिका विद्यार्थी समिती'च्या मीटिंग घ्यायचो. ही लायब्ररी म्हणजे पत्र्याच्या शेडमध्ये उभा केलेला खजिनाच आहे. बाबांच्या या लायब्ररीतूनचं चंदनकुमार यांच्याशी ओळख झाली. वेठबिगारीचा बळी ठरलेल्या छत्तीसगडच्या काही मजुरांच्या सुटकेसाठी बाबा आणि नितीन पवार सर यांनी चंदनकुमारांसोबत मला पाठवलं होतं. पुण्याहून ६०-७० किलोमीटरवर एका डोंगराच्या पायथ्याशी फॅक्टरीमध्ये या मजुरांना डांबून ठेवलेलं होतं. त्यांचे फोन फॅक्टरीचालकानं जप्त केले होते. प्यायला पाणी नाही. नीटसं अन्न नाही. बारा बारा तास कामं. अशा अवस्थेत हे मजूर असल्याचं बाबांना आणि चंदनकुमार यांना समजलं होतं. आमच्यासोबत पोलिसांचीही टीम होती. बाबा स्वतः यात लक्ष घालत असल्यामुळे या १४ मजुरांची सुखरूप सुटका झाली होती. जवळपास पाच वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. या प्रसंगानं मला अजून संवेदनशील बनवलं आणि बाबांविषयीचा आदर अजून वाढला. पुढं 'हमाल पंचायत'च्या ऑफिसमध्ये, फुलेवाड्याच्या व्याख्यानमालेत, 'अभ्यासिका विद्यार्थी समिती'च्या कार्यक्रमांमध्ये, 'संविधान प्रचारक' च्या आणि 'छात्रभारती'च्या शिबिरांमधून बाबांच्या सान्निध्यात राहता आलं. बाबांनी आपलं संपूर्ण जीवन असंघटित आणि वंचित-कष्टकरी; विशेषतः हमाल, रिक्षाचालक आणि बांधकाममजुरांचं संघटन करून त्यांना न्याय, सामाजिक सुरक्षा आणि सन्मान मिळवून देण्यासाठी समर्पित केलं. आपल्या सामाजिक कार्यासाठी बाबांनी आपली वाणी आणि लेखणी झिजवली. ते उत्तम लेखक आणि वक्ते होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**विदर्भाचा मुद्दा चर्चेचा विषय** बावनकुळेंच्या विधानाने राजकारण तापणार

# महाराष्ट्रातून विदर्भ वेगळा होणार?

## राज्य विभाजनाने विकास होत नाही

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**संसदेच्या हिवाळी अधिवेशनाप्रमाणे विधी मंडळाचे हिवाळी अधिवेशनही जोरदार वादळी होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री विजय वडेट्टीवार यांनी वेगळ्या विदर्भाची मागणी उपस्थित करत हा मुद्दा पुन्हा चर्चेत आणला. त्यामुळे राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**




नागपूरमध्ये विधानसभेचे हिवाळी अधिवेशन सुरू होताच, वेगळ्या विदर्भाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेचा विषय बनला आहे. ज्येष्ठ विजय वडेट्टीवार यांनी हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर, भाजप नेते आणि राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली.महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी वेगळ्या विदर्भाच्या मागणीवर ठाम भूमिका घेतली आणि भाजपची भूमिका कायम असल्याचे स्पष्ट केले. एका वृत्तवाहिनीशी बोलताना बावनकुळे म्हणाले की, भाजप त्यावर काम करत आहे. काँग्रेस पक्ष आता वेगळ्या विदर्भाचा मुद्दा उपस्थित करत आहे, परंतु हा मुद्दा भाजपच्या अजेंड्याचा भाग आहे. भाजपची भूमिका वेगळ्या विदर्भ राज्याच्या बाजूने आहे आणि हा मुद्दा त्यांच्या अजेंड्यात कायम आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आतापर्यंत वेगळ्या विदर्भाची भूमिका घेतली आहे. वेगळ्या विदर्भ राज्याच्या मागणीबाबत भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट भूमिका मांडली आहे. "वेगळ्या विदर्भाच्या मागणीला समर्थनाचा विषय नाही. आमचे मत स्पष्ट आहे— विदर्भाचा अनुशेष भरून काढला पाहिजे. विदर्भातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसेच अनेक मंत्री कार्यरत असल्याने प्रदेशाच्या विकासाकडे पुरेसे लक्ष दिले जात आहे.वेगळ्या मराठवाड्याची मागणी झाल्याची आठवण करून देत बावनकुळे म्हणाले की, "राज्य विभाजनाने विकास होत नाही. सर्वांनी मिळून महाराष्ट्र प्रगत करण्याचा प्रयत्न करावा." याच भूमिकेला समर्थन देत शिंदे गटाचे मंत्री संजय शिरसाट यांनीही वेगळ्या विदर्भाच्या मागणीला विरोध दर्शवला.काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी त्यांच्या मागणीमागे विदर्भाचा विकास आणि सामाजिक गतिशीलता ही कारणे दिली. वेगळ्या विदर्भाशिवाय विदर्भाच्या विकासाच्या अभावाचे निराकरण करणे अशक्य आहे. सध्याच्या सामाजिक गतिशीलतेनुसार, विदर्भ हा एक मिश्र समाज आहे, ज्यामध्ये ओबीसी, दलित, आदिवासी आणि अल्पसंख्याकांचे वर्चस्व आहे. या समुदायांना सत्तेत खूप कमी संधी मिळाल्या आहेत. जोपर्यंत हे समुदाय सत्तेत सहभागी होत नाहीत तोपर्यंत या प्रदेशाला न्याय मिळू शकत नाही. म्हणून, भविष्यात वेगळा विदर्भ निर्माण झाला पाहिजे, अशी त्यांची मागणी आहे.महाराष्ट्रात एका विशिष्ट समुदायाचे वर्चस्व वाढले आहे. विदर्भातील नागरिक गेल्या अनेक दिवसांपासून वेगळ्या विदर्भाची मागणी करत असले तरी, राज्य सरकारने आतापर्यंत त्याकडे दुर्लक्ष केले आहे. या पार्श्वभूमीवर, विरोधी पक्षाच्या बैठकीत वेगळ्या विदर्भाच्या मुद्द्यावर सविस्तर चर्चा केली जाईल, असेही वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले. या अधिवेशनात हा मुद्दा पुन्हा चर्चेत येण्याची चिन्हे आहेत.संसदेच्या हिवाळी अधिवेशनाप्रमाणे विधी मंडळाचे हिवाळी अधिवेशनही जोरदार वादळी होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री विजय वडेट्टीवार यांनी वेगळ्या विदर्भाची मागणी उपस्थित राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता निर्माण झाली आहे.नागपूरमध्ये विधानसभेचे हिवाळी अधिवेशन सुरू होताच, वेगळ्या विदर्भाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेचा विषय बनला आहे. ज्येष्ठ विजय वडेट्टीवार यांनी हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर, भाजप नेते आणि राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली.

### महाराष्ट्र प्रगत करण्याचा प्रयत्न

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी वेगळ्या विदर्भाच्या मागणीवर ठाम भूमिका घेतली आणि भाजपची भूमिका कायम असल्याचे स्पष्ट केले. एका वृत्तवाहिनीशी बोलताना बावनकुळे म्हणाले की, भाजप त्यावर काम करत आहे. काँग्रेस पक्ष आता वेगळ्या विदर्भाचा मुद्दा उपस्थित करत आहे, परंतु हा मुद्दा भाजपच्या अजेंड्याचा भाग आहे.

# एंटरटेनमेंट अरेना आता नवी मुंबईत!


## सिडकोतर्फे प्रकल्प उभारण्याच्या प्रक्रियेला सुरुवात

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**दूरदर्शी नियोजनाद्वारे व विशिष्ट उद्देशाने विकसित करण्यात आलेले नवी मुंबई हे देशाच्या नगर नियोजनाला नवीन दिशा देणारे शहर ठरले आहे. भविष्यातील शहर म्हणून संकल्पित असलेली नवी मुंबई वर्तमानातील शहर म्हणून दिमाखाने झळकत आहे. हे परिवर्तन घडवून आणण्यासह देशातील थेट करमणूक क्रांतीचा केंद्रबिंदू म्हणून नवी मुंबईला नावारूपाला आणत असल्याचा सिडकोला सार्थ अभिमान आहे.**

या संदर्भातील एक महत्त्वाचे पाऊल म्हणून देशातील पहिला आयकॉनिक मल्टिपर्पज इनडोअर लाईव्ह एन्टरटेनमेन्ट अरेना नवी मुंबईमध्ये उभारण्यासाठी सिडकोतर्फे स्वारस्य अभिव्यक्ती जारी करून प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. स्वारस्य अभिव्यक्ती दस्तऐवज दि. 9 डिसेंबर 2025 पासून ऑनलाइन उपलब्ध असणार असून निविदा सादर करण्याची अंतिम मुदत दि. 31 डिसेंबर 2025 रोजी संध्याकाळी 05.00 वाजेपर्यंत (भारतीय प्रमाण वेळ) आहे. न्यूयॉर्क येथील मॅडिसन स्क्वेअर गार्डन आणि लंडन येथील ओटू अरेना या बहुउद्देशीय नाट्यगृहांपासून प्रेरणा घेऊन विकसित करण्यात



येणारा हा प्रकल्प देशातील करमणूक पायाभूत सुविधांमध्ये नवीन मानदंड प्रस्थापित करणार आहे. रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या संगीतसभा, आंतरराष्ट्रीय क्रीडाविषयक कार्यक्रम, भव्य स्तरावरील सांस्कृतिक महोत्सव आणि आभासी अनुभव यांच्या आयोजनाकरिता 20,000 प्रेक्षकांसाठी आसन व्यवस्था आणि 25,000 उभे प्रेक्षक इतकी क्षमता या ठिकाणी असणार आहे. यामुळे हा देशातील पहिला जागतिक दर्जाचा व भव्य क्षमता असणारा इनडोअर अरेना असणार आहे. नवी मुंबईला जागतिक दर्जाचे करमणूक केंद्र व उत्कृष्ट शहर म्हणून प्रस्थापित करण्याचा सिडकोला सार्थ अभिमान आहे.

एन्टरटेनमेन्ट अरेना उभारणीसाठी सुरू करण्यात आलेली प्रक्रिया ही आगामी सांस्कृतिक आणि आर्थिक क्रांतीचा पाया आहे. या प्रकल्पाद्वारे जागतिक दर्जाची करमणूक भारतीयांकरिता खुली होऊन कलाकार, उद्योजक आणि स्थानिक समूहांकरिता व्यापक प्रमाणावर संधी उपलब्ध होणार आहेत व नवी मुंबईचे जागतिक नकाशावरील स्थान अधिक बळकट होणार आहे. प्रत्येक टप्प्यावर कल्पनांना मूर्त रूप देण्यासाठी असलेली सिडकोची कटिबद्धता अधोरेखित होत आहे."

### होणारे फायदे काय आहेत?

उद्योग क्षेत्रातील प्रतिष्ठित हितसंबंधींसोबत भागीदारी करून जागतिक दर्जाचे ज्ञान व परिचालन क्षमता आणून देशातील करमणूक क्षेत्राच्या भविष्याला आकार देण्याचा सिडकोचा प्रयत्न आहे. हा उपक्रम केवळ अरेना विकसित करण्यापुरता मर्यादित नसून सांस्कृतिक व आर्थिक चळवळीची ही सुरुवात आहे.

देशात राजकीय वादळ

## निवडणूक आयोगावर सुप्रिया सुळेंची जोरदार टीका

# महाराष्ट्रामध्ये निवडणूक आयोग नाही!

## लोकशाहीची रक्षा कोण करणार?

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) च्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मंगळवारी लोकसभेत निवडणूक आयोगावर (ELECTION COMMISSION) तीव्र शब्दांत टीका केली. आयोगाने आता तटस्थता गमावली असून, भ्रष्टाचार आणि हिंसाचार रोखण्यात अपयशी ठरत आहे. तसेच, लोकशाहीसाठी धोकादायक असलेल्या यंत्रणेतील त्रुटींकडे आयोग जाणूनबुजून दुर्लक्ष करत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. लोकसभेत निवडणूक सुधारणांवर (ELECTORAL REFORMS) चर्चा सुरू असताना सुप्रिया सुळे यांनी आपले मत मांडले.**



सुप्रिया सुळे यांनी महाराष्ट्रातील अलीकडील पंचायत निवडणुकांचा उल्लेख करत परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचे सांगितले. "महाराष्ट्रात उघडपणे रोख रक्कम वाटली गेली. नामनिर्देशन आणि नामवापसीमध्ये गडबडी झाल्या. हिंसाचार रेकॉर्ड पातळीवर पोहोचला, वाहनांची तोडफोड झाली, बंदुका दाखवण्यात आल्या आणि ईव्हीएमचे लॉकसुद्धा तोडले गेले." यावरून सुळे यांनी अत्यंत कठोर शब्दांत म्हटले की, "महाराष्ट्रामध्ये कोणताही निवडणूक आयोग अस्तित्वात नाही."सुळे म्हणाल्या की, सामान्य जनतेचा निवडणूक आयोगावरील विश्वास कमी झाला आहे. लोकांना वाटू लागले आहे की, आयोग आता निष्पक्ष राहिलेला नाही. आयोग द्वेषपूर्ण भाषणे थांबवण्यात अपयशी ठरला आहे, तसेच डिजिटल जगात पसरणाऱ्या खोट्या बातम्या, डीपफेक आणि लक्ष्यित प्रचाराला रोखू शकत नाही, असा आरोप त्यांनी केला. निवडणूक आयुक्तांची नियुक्तीही राजकीय झुकती असलेली होत चालली आहे, ज्यामुळे संस्थेची विश्वसनीयता कमकुवत होत आहे. राजकीय पक्ष रोजच्या खर्चाची मर्यादा तोडतात, पण आयोग त्याकडे डोळेझाक करतो. विशेषतः गरीब, स्थलांतरित आणि वंचित घटकांना याचा फटका बसतो. सुळे यांनी शेवटी उपरोधिक प्रश्न विचारला, "निवडणूक आयोग लोकशाहीची रक्षा करेल, की लोकशाहीला स्वतःच आपली रक्षा करावी लागेल?" त्यांनी स्पष्ट केले की, निवडणूक आयोगाने लोकशाहीचा तटस्थ रक्षक बनले पाहिजे.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) च्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मंगळवारी लोकसभेत निवडणूक आयोगावर (ELECTION COMMISSION) तीव्र शब्दांत टीका केली. आयोगाने आता तटस्थता गमावली असून, भ्रष्टाचार आणि हिंसाचार रोखण्यात अपयशी ठरत आहे.

तसेच, लोकशाहीसाठी धोकादायक असलेल्या यंत्रणेतील त्रुटींकडे आयोग जाणूनबुजून दुर्लक्ष करत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. लोकसभेत निवडणूक सुधारणांवर (ELECTORAL REFORMS) चर्चा सुरू असताना सुप्रिया सुळे यांनी आपले मत मांडले. सुप्रिया सुळे यांनी महाराष्ट्रातील अलीकडील पंचायत निवडणुकांचा उल्लेख करत परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचे सांगितले. "महाराष्ट्रात उघडपणे रोख रक्कम वाटली गेली.

नामनिर्देशन आणि नामवापसीमध्ये गडबडी झाल्या. हिंसाचार रेकॉर्ड पातळीवर पोहोचला, वाहनांची तोडफोड झाली, बंदुका दाखवण्यात आल्या आणि ईव्हीएमचे लॉकसुद्धा तोडले गेले." यावरून सुळे यांनी अत्यंत कठोर शब्दांत म्हटले की, "महाराष्ट्रामध्ये कोणताही निवडणूक आयोग अस्तित्वात नाही."सुळे म्हणाल्या की, सामान्य जनतेचा निवडणूक आयोगावरील विश्वास कमी झाला आहे. लोकांना वाटू लागले आहे.

### आयोग अस्तित्वात नाही!

की, आयोग आता निष्पक्ष राहिलेला नाही. आयोग द्वेषपूर्ण भाषणे थांबवण्यात अपयशी ठरला आहे, तसेच डिजिटल जगात पसरणाऱ्या खोट्या बातम्या, डीपफेक आणि लक्ष्यित प्रचाराला रोखू शकत नाही, असा आरोप त्यांनी केला. निवडणूक आयुक्तांची नियुक्तीही राजकीय झुकती असलेली होत चालली आहे, ज्यामुळे संस्थेची विश्वसनीयता कमकुवत होत आहे.

# 'इंडिगोची सेवा पुन्हा पूर्ववत!


## 1,800 हून अधिक विमान उड्डाण;सीईओंनी एक निवेदन प्रसिद्ध केले

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या अनेक दिवसांपासून संकटाचा सामना करत असलेली इंडिगो एअरलाइन्स (INDIGO FLIGHT) पुन्हा पूर्ववत येऊ लागली आहे, असा दावा इंडिगोचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर अल्बर्स यांनी केला आहे. यासंदर्भात सीईओंनी एक निवेदन प्रसिद्ध केले असून त्यांनी म्हटलं की, "तुमची एअरलाइन, इंडिगो, पुन्हा एकदा आपल्या उभी राहिली आहे. आमचे कामकाज आता पुन्हा स्थिर झाले आहे".**

सोशल मीडियावर प्रसिद्ध केलेल्या व्हिडिओ संदेशात पीटर एल्बर्स यांनी सांगितले की, कंपनीने सोमवार, ८ डिसेंबर रोजी १,८०० विमानांनी उड्डाण घेतली तर आज १,८०० हून अधिक उड्डाणे घेतली आहे. एअरलाइनच्या वेबसाइटवर प्रदर्शित केलेल्या सर्व उड्डाणे प्रत्यक्षात त्यांच्या गंतव्यस्थानावर पोहोचतील.२,३०० उड्डाणांच्या दैनिक वेळापत्रकासह, कंपनीने ५ डिसेंबर रोजी १,५०० हून अधिक उड्डाणे रद्द केली. जी देशाच्या विमान वाहतूक इतिहासातील एक अभूतपूर्व संख्या आहे. वेळापत्रकानुसार उड्डाणे चालवण्यात अयशस्वी झाल्यानंतर, कंपनीने दीर्घकाळ चालणाऱ्या विलंब आणि






रद्दीकरणांना आळा घालण्यासाठी हे एक मोठे रीबूट म्हणून वर्णन केले होते.इंडिगोचे सीईओ म्हणाले की, ग्राहक पुन्हा एकदा एअरलाइनच्या नेटवर्कवर बुकिंग करत आहेत. जे त्यांचा विश्वास दर्शवते. त्यांनी सांगितले की, कंपनीने रद्द केलेल्या फ्लाइट्ससाठी लाखो ग्राहकांना पैसे परत केले आहेत आणि ही प्रक्रिया लवकरच पूर्ण केली जाईल. विमानतळांवर अडकलेले बहुतेक सामान प्रवाशांच्या घरी पोहोचवण्यात आले आहे आणि उर्वरित सामान देखील लवकरच पोहोचवले जाईल. त्यांनी सांगितले की इंडिगो सरकारला पूर्ण सहकार्य करत आहे.

आज विमान वाहतूक मंत्र्यांनी इंडिगो एअरलाइन्सच्या कामकाजाबाबत लोकसभेत उत्तर दिले. नागरी विमान वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी मंगळवारी सांगितले की कोणत्याही एअरलाइनला प्रवाशांसाठी समस्या निर्माण करण्याची परवानगी दिली जाणार नाही. लोकसभेत या मुद्द्यावर निवेदन देताना नायडू म्हणाले की, देशभरातील उड्डाण ऑपरेशन्समधील त्रुटींमुळे प्रवाशांना होणाऱ्या समस्यांसाठी इंडिगोवर कठोर आणि योग्य कारवाई केली जाईल.

### सीईओ प्रवाशांना दिलासा

लाखो ग्राहकांना त्यांचे पूर्ण परतफेड आधीच मिळाले आहे आणि आम्ही दररोज ते करत राहतो. तुम्ही खात्री बाळगू शकता की आम्ही ही जबाबदारी पूर्ण करण्यासाठी पूर्णपणे वचनबद्ध आहोत." त्यांनी सांगितले की विमानतळांवर अडकलेल्या बहुतेक बॅगा लोकांच्या घरी पोहोचवण्यात आल्या आहेत आणि इंडिगो टीम उर्वरित बॅगा पोहोचवण्यासाठी कठोर परिश्रम करत आहेत.

# बोमन ईरानी यांच्या पोस्टमुळे चाहते चिंतेत



चित्रपटसृष्टीतील बहुतेक सेलिब्रिटी सतत धावपळ करत असतात, सतत नवीन प्रोजेक्ट्स शोधत असतात. ते त्यांच्या कामात इतके व्यस्त होतात की त्यांच्याकडे कुटुंबासाठी किंवा स्वतःसाठीही वेळ नसतो. असे असूनही, बहुतेक कलाकार यश आणि अधिक कामाच्या मागे धावत राहतात. दुसरीकडे, बोमन इराणी यांनी त्यांच्या नवीन पोस्टने चाहत्यांना आश्चर्यचकित केले आहे. त्यांचे चाहते “द राजा साब” चित्रपटात त्यांना पाहण्यास उत्सुक असताना, त्यांनी इंस्टाग्रामवर एक गूढ पोस्ट शेअर केली आहे, ज्यामध्ये त्यांनी कामातून ब्रेक घेण्याची इच्छा व्यक्त केली आहे.बोमन इराणी यांनी नुकतीच इंस्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे, ज्यामुळे त्यांच्या चाहत्यांना प्रश्न पडला आहे की तो बॉलिवूडमधून ब्रेक घेणार आहे का. अभिनेत्याने त्यांच्या पोस्टमध्ये लिहिले आहे की, “तुम्हाला ते दिवस आठवतात का जेव्हा सर्व काही डेजा वूसारखे वाटत होते? तेच जुन्या कथा आणि सर्व नाट्य. प्रामाणिकपणे सांगायचे तर, मला वाटते की मी अखेर माझ्या मर्यादिपर्यंत पोहोचलो आहे. मी थकलो आहे. कदाचित आता काही काळासाठी दूर जाण्याची वेळ आली आहे. गोंधळ नाही, नाटक नाही. मी ठीक आहे, फक्त श्वास घ्यायचा आहे. फक्त माझे विचार... त्यात जास्त वाचू नका.”बहुतेक कलाकारांचा प्रवास अर्ध्यावर असताना बोमन इराणी यांनी इंडस्ट्रीमध्ये आपला प्रवास सुरू केला. बोमन ४४ वर्षांचे होते.

# बॉर्डर 2 मधील अहान शेट्टीचा पहिला लूक प्रदर्शित

बहुप्रतिक्षित युद्ध चित्रपट ‘बॉर्डर २’ लवकरच थिएटरमध्ये दाखल होणार आहे.टी-सीरीज फिल्म्स आणि जेपी फिल्म्सच्या बॅनरखाली निर्मित “बॉर्डर २” हा चित्रपट २३ जानेवारी २०२६ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये आधीच उत्सुकता आहे. दिलजीत दोसांझ, सनी देओल आणि वरुण धवन यांच्यानंतर, अहान शेट्टीचा पहिला लूक आता प्रदर्शित झाला आहे, जो खूपच प्रभावी आहे.“बॉर्डर २” या चित्रपटात अहान शेट्टी एका नौदल अधिकाऱ्याची भूमिका साकारत आहे. आज प्रदर्शित झालेल्या पहिल्या लूकमध्ये तो युद्धाच्या मध्यभागी रक्ताने माखलेल्या गणवेशात उभा राहून मोर्टार गनमधून गोळीबार करताना दिसतो. त्याच्या आक्रमक आणि रागीट लूकमुळे चाहते थक्क झाले आहेत, कारण हा चित्रपट त्याच्या कारकिर्दीला मोठी चालना देणारा ठरणार आहे.टी-



सीरीज फिल्म्सच्या इंस्टाग्रामवर शेअर केलेल्या या पोस्टरवर लोक फायर इमोजीसह प्रतिक्रिया देत आहेत. ते निर्मात्यांना लवकरात लवकर ट्रेलर रिलीज करण्याची मागणी देखील करत आहेत. शिवाय, अहान शेट्टीचे पोस्टर पाहिल्यानंतर काहींनी ते “ब्लॉकबस्टर” म्हणून घोषित केले.

तर दुसऱ्याने म्हटले की, “पोस्टर दाखवल्याप्रमाणे हा चित्रपट स्फोटक असेल.”अनुराग सिंग दिग्दर्शित “बॉर्डर २” मध्ये सनी देओल, वरुण धवन, दिलजीत दोसांझ, अहान शेट्टी, मेधा राणा, मोना सिंग आणि सोनम बाजवा यांच्या प्रमुख भूमिका आहेत. भूषण कुमार, जे.पी. दत्ता आणि निधी दत्ता यांनी हा चित्रपट निर्मित केला आहे आणि २३ जानेवारी २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होईल. १९९६ मध्ये प्रदर्शित झालेल्या पहिल्या भागात सुनील शेट्टी, सनी देओल, अक्षय खन्ना, जॅकी श्रॉफ, सुदेश बेरी, पुनीत इस्सर, कुलभूषण खरबंदा आणि रजनीत हे कलाकार होते. तर दुसऱ्या भागात आता फक्त “गदर २” कलाकार दिसतील. बहुप्रतिक्षित युद्ध चित्रपट ‘बॉर्डर २’ लवकरच थिएटरमध्ये दाखल होणार आहे.टी-सीरीज फिल्म्स आणि जेपी फिल्म्सच्या बॅनरखाली निर्मित “बॉर्डर २” हा चित्रपट २३ जानेवारी २०२६ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये आधीच उत्सुकता आहे.अहान शेट्टीचा पहिला लूक आता प्रदर्शित झाला आहे, आज प्रदर्शित झालेल्या पहिल्या लूकमध्ये तो युद्धाच्या मध्यभागी रक्ताने माखलेल्या गणवेशात उभा राहून मोर्टार गनमधून गोळीबार करताना दिसतो. त्याच्या आक्रमक आणि रागीट लूकमुळे चाहते थक्क झाले आहेत.

# माझ्या मनातलं सगळंच

मराठी अभिनेत्री तेजस्विनी पंडितने आजवर अनेक भूमिका साकारल्या आहेत. एक अभिनेत्री असण्याबरोबरच ती निर्मातीदेखील आहे. तेजस्विनीने आपल्या अभिनयाच्या जोरावर मनोरंजनसृष्टीत नाव कमावलं आहे. स्वामी समर्थांची प्रचिती, अनुभव अनेकांना येत असतो. श्री स्वामी समर्थांची सेवा मराठी सिनेसृष्टीतील अनेक कलाकार मोठ्या भक्तिभावानं करतात. लोकप्रिय अभिनेत्री तेजस्विनी पंडितदेखील स्वामींची भक्त आहे. अभिनेत्रीने तिच्या इन्स्टाग्रामवर श्री स्वामी समर्थांचा फोटो शेअर करत श्रद्धा व्यक्त केली. तेजस्विनीने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. अभिनेत्रीने विठ्ठलाच्या रुपात सजलेल्या स्वामी समर्थांचा फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. फोटो शेअर करत तिने कॅप्शन दिलं आहे, “माझ्या मनातलं सगळंच तुम्हाला माहीत आहे, फक्त पाठीशी रहा आणि बळ द्या स्वामी माऊली. आषाढी एकादशी अगदी नजीक येऊन ठेपली असताना हे चित्र नजरेस पडणं म्हणजे किती सुरेख योगायोग.” तेजस्विनी पंडितने शेअर केलेल्या पोस्टवर अनेकांनी ‘श्री स्वामी समर्थ’ अशा कमेंट केल्या आहेत. अभिनेत्री तेजस्विनी पंडितचा लवकरच ‘येरे येरे पैसा ३’ चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन संजय जाधव यांनी केले आहे. हा चित्रपट १८ जुलैला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. ‘येरे येरे पैसा ३’ या चित्रपटात तेजस्विनीसह सिद्धार्थ जाधव, संजय नार्वेकर, उमेश कामत, विशाखा सुभेदार, आनंद इंगळे, नागेश भोसले, वनिता खरात, जयवंत वाडकर यांच्यासह आणखी काही चर्चित चेहरे दिसणार आहेत.



# तेलंगणात १० हजार कोटींची टाउनशिप

बॉलीवूड सुपरस्टार सलमान खान आता रिअल इस्टेट जगात प्रवेश करणार आहे. त्याची कंपनी, सलमान खान व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड (SKV) ने तेलंगणा सरकारसोबत एक सामंजस्य करार (MOU) केला आहे, ज्यामध्ये राज्यात १०,००० कोटी किमतीच्या एकात्मिक टाउनशिपची योजना जाहीर केली आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की अभिनयाव्यतिरिक्त, सलमान खान व्यवसायात देखील सामील आहे. त्याचे एक प्रॉडक्शन हाऊस आहे, “बीइंग ह्युमन” नावाची एक एनजीओ चालवतो आणि त्याच्याकडे कपड्यांचा ब्रँड आहे. तो त्याच्या जिम चेन “SK27 जिम” द्वारे फिटनेसला देखील प्रोत्साहन देतो. हा प्रस्तावित प्रकल्प 500 एकर परिसरात विकसित केला जाणार असून, राहणीमान, व्यवसाय, मनोरंजन आणि क्रीडा यांच्या सर्व सुविधा एका ठिकाणी उपलब्ध असतील. याचा उद्देश शहरातील जीवनशैलीला पूर्णपणे नवी आणि वर्ल्ड-क्लास दिशा देणे आहे.

# प्रसिद्ध निर्माते एकता कपूरवर संतापले



भारतीय टेलिव्हिजनची ‘क्वीन’ एकता कपूरने २५ वर्षांपूर्वी तिच्या पहिल्या के-शो मालिका सुरू केल्या. निर्माती-दिग्दर्शिका तिच्या ‘क्योंकि सास भी कभी बहू थी’ आणि ‘कहानी घर घर की’ या शोसाठी प्रसिद्ध झाली. ‘क्योंकि सास भी कभी बहू थी’ प्रेक्षकांमध्ये, विशेषतः महिला प्रेक्षकांमध्ये खूप लोकप्रिय आहे. या शोची खूप चर्चा झाली आहे. ही एक हिंदी मालिका आहे, जी स्टार प्लसवर ३ जुलै २००० ते ६ नोव्हेंबर २००८ या कालावधीत प्रसारित झाली होती. शोभा कपूर आणि एकता कपूर यांनी त्यांच्या बालाजी टेलिफिल्म्स बॅनरखाली या शोची निर्मिती केली होती.एकताने सासू-सुनेचे असे शो आणले आहेत जे काही लोकांना खूप आवडले, तर काहींना हे शो आवडले नाहीत. एकता कपूरवर भारतीय संस्कृतीला बरबाद केल्याचा आरोप केला आहे.‘लर्न फ्रॉम द लेजेंड’ या यूट्यूब चॅनेलवरील अलीकडेच झालेल्या संवादात पहलाज निहलानी यांनी एकतावर तिच्या शोमध्ये दोन बायकांची संकल्पना दाखवल्याबद्दल आरोप केले. पण, त्यांनी असेही म्हटले की तिच्या शोमध्ये महिलांना अनेक वेळा लग्न करताना दाखवले जाते.

हार्दिक पंड्याचा नवा रेकॉर्ड

भारत विरूद्ध दक्षिण आफ्रिका टी२० सामन्यात रेकॉर्ड

# हार्दिक पंड्याची धुव्वाधार खेळी!

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मंगळवारी कटक येथील बाराबती स्टेडियमवर झालेल्या पहिल्या टी-२० सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी १७६ धावांचे लक्ष्य दिले. हार्दिक पंड्याने २८ चेंडूत नाबाद ५९ धावा केल्या. त्याने चार उत्तुंग षटकारही मारले आणि तो टी-२० कारकिर्दीत १०० षटकार मारणारा चौथा भारतीय फलंदाज ठरला. यापूर्वी विराट कोहली (१२४), सूर्यकुमार यादव (१५५) आणि रोहित शर्मा (२०५) यांनी हा पराक्रम केला आहे आणि आता हार्दिक पंड्याने आपले नाव या यादीत नोंदवले आहे.**

## १०० सिक्स मारणारा चौथा भारतीय







२६ सप्टेंबर रोजी श्रीलंकेविरुद्ध आशिया कप २०२५ च्या सुपर फोर सामन्यात हार्दिक पंड्याला दुखापत झाली होती, ज्यामुळे तो बराच काळ खेळू शकला नाही. काही आठवडे बरा झाल्यानंतर, पंड्याने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये बडोद्यासाठी उत्कृष्ट कामगिरी केली, ज्यामुळे त्याला टीम इंडियामध्ये बोलावण्यात आले. पंड्याने मालिकेच्या पहिल्याच सामन्यात आपली तंदुरुस्ती सिद्ध केली आहे. तत्पूर्वी, दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून भारताला फलंदाजीसाठी आमंत्रित केले होते, परंतु टीम इंडियाची सुरुवात खराब झाली. यजमान संघाने तिसऱ्या चेंडूवर शुभमन गिल (४) गमावला. त्यानंतर कर्णधार सूर्यकुमार यादव (१२) यांनीही पाठलाग केला. भारताने १७ धावांवर दोन विकेट गमावल्या होत्या. त्यानंतर अभिषेक शर्माने तिलक वर्मासोबत तिसऱ्या विकेटसाठी ३१ धावा जोडून संघाला पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न केला. १७ धावा काढून अभिषेक पॅव्हेलियनमध्ये परतला. तिलक वर्मा (२६) यांनी अक्षर पटेलसोबत चौथ्या विकेटसाठी ३० धावा जोडल्या. त्यानंतर हार्दिक पंड्या भारताच्या डावाला बळकटी देण्यासाठी आला. पंड्याने अक्षर पटेल (२३) सोबत २६ धावांची भागीदारी केली, त्यानंतर शिवम दुबे (११) सोबत ३३ धावा आणि जितेश शर्मासोबत ३८ धावा करून भारताला संकटातून बाहेर काढले. हार्दिक पंड्या ५९ धावांवर नाबाद राहिला, त्याने चार षटकार आणि सहा चौकार मारले, तर जितेश शर्मा पाच चेंडूत १० धावांवर नाबाद राहिला. दक्षिण आफ्रिकेकडून लुंगी एनगिडीने तीन बळी घेतले, तर लुथो सिम्पालाने दोन बळी घेतले. डेव्हॉन फरेरा यांनीही एक बळी घेतला.हार्दिकच्या झंझावाती खेळीमुळे १७६ धावांचे लक्ष्य दक्षिण आफ्रिकेसमोर होते. मात्र भारतीय गोलंदाजापुढे टीमचा अजिबात टिकाव लागला नाही आणि केवळ ७४ धावांमध्ये दक्षिण आफ्रिकेचा संपूर्ण संघ गारद होण्याची नामुष्कीही ओढवली. १०१ धावांनी दणदणीत विजय भारतीयांनी मिळवला. यामध्ये हार्दिक पंड्याचा मोठा वाटा आहे हे मात्र नक्की!मंगळवारी कटक येथील बाराबती स्टेडियमवर झालेल्या पहिल्या टी-२० सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी १७६ धावांचे लक्ष्य दिले. हार्दिक पंड्याने २८ चेंडूत नाबाद ५९ धावा केल्या. त्याने चार उत्तुंग षटकारही मारले आणि तो टी-२० कारकिर्दीत १०० षटकार मारणारा चौथा भारतीय फलंदाज ठरला. यापूर्वी विराट कोहली (१२४), सूर्यकुमार यादव (१५५) आणि रोहित शर्मा (२०५) यांनी हा पराक्रम केला आहे आणि आता हार्दिक पंड्याने आपले नाव या यादीत नोंदवले आहे. २६ सप्टेंबर रोजी श्रीलंकेविरुद्ध आशिया कप २०२५ च्या सुपर फोर सामन्यात हार्दिक पंड्याला दुखापत झाली होती, ज्यामुळे तो बराच काळ खेळू शकला नाही. काही आठवडे बरा झाल्यानंतर, पंड्याने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये बडोद्यासाठी उत्कृष्ट कामगिरी केली, ज्यामुळे त्याला टीम इंडियामध्ये बोलावण्यात आले. पंड्याने मालिकेच्या पहिल्याच सामन्यात आपली तंदुरुस्ती सिद्ध केली आहे. तत्पूर्वी, दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून भारताला फलंदाजीसाठी आमंत्रित केले होते, परंतु टीम इंडियाची सुरुवात खराब झाली. यजमान संघाने तिसऱ्या चेंडूवर शुभमन गिल (४) गमावला.

## आशियानंतर पहिल्यांदाच खेळला

त्यानंतर कर्णधार सूर्यकुमार यादव (१२) यांनीही पाठलाग केला. भारताने १७ धावांवर दोन विकेट गमावल्या होत्या. त्यानंतर अभिषेक शर्माने तिलक वर्मासोबत तिसऱ्या विकेटसाठी ३१ धावा जोडून संघाला पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न केला. १७ धावा काढून अभिषेक पॅव्हेलियनमध्ये परतला.तिलक वर्मा (२६) यांनी अक्षर पटेलसोबत चौथ्या विकेटसाठी ३० धावा जोडल्या. त्यानंतर हार्दिक पंड्या भारताच्या डावाला बळकटी देण्यासाठी आला.

# कटकमध्ये तिलक वर्माचा सुपरमॅन शो!

## थेट स्टेडियमबाहेरचे गेला; याचा आता व्हिडिओ व्हायरल

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिला सामना ९ डिसेंबर रोजी कटकमधील बाराबती स्टेडियमवर खेळवण्यात येत आहे. दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.**



तर भारतीय संघ प्रथम फलंदाजी करायला मैदानात उतरला आणि हार्दिक पंड्याच्या अर्धशतकाच्या जोरावर ६ बाद १७५ धावा काढल्या. या सामन्यात तिलक वर्माने एक शानदार षटकार ठोकून सर्वांचे लक्ष्य वेधले आहे. त्याने टोलवलेला चेंडू थेट स्टेडियमबाहेरचे गेला. याचा आता व्हिडिओ व्हायरल झाला आहे. भारतीय डावाची सुरुवात खराब झाली. शुभमन गिल फक्त २ चेंडूत ४ धावा करून आबाद झाला. त्यानंतर कर्णधार सूर्यकुमार यादव मोठी खेळी करू शकला नाही आणि ११ चेंडूत १२ धावा काढून पॅव्हेलियनमध्ये परतला. अभिषेक शर्मा देखील आपली जादू दाखवू शकला नाही. त्याने १२ चेंडूत १७ धावा काढल्या आणि बाद झाला. पाचव्या क्रमांकावर आलेला अक्षर पटेलने २१ चेंडूत २३ धावा करून बाद झाला.तिलक वर्माने भारताचा डाव सांभाळला. त्याच्या डावातील सर्वात शानदार क्षणांपैकी एक पाहयला मिळाला. भारतीय डावाच्या १० व्या षटकात, तिलकने दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज ॲनरिच नोर्खियाला एक उत्तुंग षटकार खेचला आहे. षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर मारलेला फटका थेट स्टेडियमच्या बाहेरचे गेला. वृत्तानुसार, तिलक वर्माने ठोकलेला षटकार सुमारे ८९ मीटर लांब होता. त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच वेगाने व्हायरल होऊ लागला आहे.

## पंड्याचे शानदार अर्धशतक

तिलक वर्मा ३२ चेंडूत २६ धावा करून बाद झाला. त्याने आपल्या खेळीत २ चौकार आणि १ षटकार ठोकला.हार्दिकने भारताचा डाव सांभाळून घेत भारताला १७५ पर्यंत पोहचवले. त्याने २५ चेंडूत ५ चौकार आणि ४ षटकारांसह आपले अर्धशतक पूर्ण केले. यादरम्यान त्याचा स्ट्राईक रेट २०० च्या वर होता. त्याने २८ चेंडूत ५९ धावा करून नाबाद राहिला.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

। बुधवार ।

। दि. 10 डिसेंबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## मिशन- PCMC: भाजपाकडे अर्ज जमा करून

# निशा यादव निवडणूक रणांगणात!

### निशा यादव यांनी केला शहरातील पहिला अर्ज जमा; ग्रामस्थांच्या उपस्थितीत दिली प्रभाग विकासाची ग्वाही



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रभाग क्रमांक ११ मधील सेवाभावी कार्यासाठी ओळख असलेल्या इंद्रायणी महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा निशा (निशाताई) यादव यांनी मंगळवारी (दि. 9) भारतीय जनता पक्षाकडून अधिकृतरित्या अर्ज जमा करून निवडणूक प्रचाराला सुरुवात केली. पक्षाच्या स्थानिक कार्यालयात झालेल्या या प्रक्रियेला महिला कार्यकर्त्या, युवक आणि ग्रामस्थांची मोठी उपस्थिती लाभली. यावेळी त्यांनी प्रभाग विकासाची ग्वाही दिली..**

निशा यादव या भाजपा युवा मोर्चाचे शहराध्यक्ष दिनेश यादव यांच्या सौभाग्यवती असून, प्रभागातील स्वच्छता, महिला सक्षमीकरण, स्थानिक विकास, नागरिकांच्या अडचणी आणि सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांनी सातत्याने सक्रिय भूमिका बजावली आहे. आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हा अर्ज आज जमा केला. यावेळी शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, सरचिटणीस मोरेश्वर शेंडगे,मधुकर बच्चे उपस्थित होते.

अर्ज जमा केल्यानंतर बोलताना निशाताईंनी प्रभागाच्या सर्वांगीण विकासाचा निर्धार व्यक्त करत नागरिकांना विश्वास दिला की, “विकासकामे, महिला सक्षमीकरण, स्वच्छता, पायाभूत सुविधा आणि तरुणांसाठी संधी या प्रत्येक बाबींवर आम्ही प्रामाणिकपणे काम करू. प्रभाग क्रमांक ११ मधील प्रत्येक नागरिकाचा प्रश्न हा माझा स्वतःचा प्रश्न आहे. जनतेच्या सहकार्याने आपला प्रभाग आदर्श प्रभाग बनवण्याचे स्वप्न आम्ही निश्चितपणे पूर्ण करू.”

#### लाडक्या बहिणींकडून स्वागत

इंद्रायणी महिला प्रतिष्ठानच्या माध्यमातून निशाताई यादव यांनी अनेक महत्त्वाचे उपक्रम महिलांसाठी राबवले आहेत त्यामुळे लाडक्या बहिणीकडून निशाताई यादव यांना जोरदार पाठिंबा आहे. प्रभागातील स्थानिक महिलांनी आणि नागरिकांनीही निशाताई शुभेच्छा देऊन त्यांना पाठिंबा जाहीर केला आहे. आगामी निवडणुकीत निशाताई यादव यांची उमेदवारी जाहीर होण्याची शक्यता वाढल्याने प्रभागातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे.

> “ भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड शहराला विकासाची गती मिळाली आहे हीच विकासाची गती कायम ठेवण्यासाठी भाजपा पक्षाच्या माध्यमातून उमेदवारी अर्ज घेतला आहे. आगामी काळात भाजपच्या ध्येय धोरणानुसार सबका साथ सबका विकास याच तत्वावर काम करायचे आहे. आमदार महेश लांडगे यांच्या विकसित शहराच्या संकल्पनेला हातभार लावायचा आहे.
>
> **-निशा दिनेश यादव,** इंद्रायणी महिला प्रतिष्ठान.

## मुलींच्या क्रिकेट संघात श्रेया तरस ची निवड

### महाराष्ट्राच्या 17 वर्षाखालील क्रिकेट स्पर्धा, एस. बी. पाटील पब्लिक स्कूलची पहिली राष्ट्रीय खेळाडू

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड :अहिल्यानगर, शिर्डी येथे झालेल्या विभागीय स्तरावरील क्रिकेट स्पर्धेत पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूल मधील १७ वर्षाखालील मुलींनी तृतीय क्रमांक मिळवला होता.**

या स्पर्धेत झालेल्या तीन डावामध्ये श्रेया तरस हिने उत्कृष्ट फलंदाजी व गोलंदाजी करत अष्टपैलू खेळ केला. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पुण्यातील तीन मुलींसह एकूण १६ विद्यार्थिनींची महाराष्ट्र क्रिकेट संघासाठी (१७ वर्षाखालील मुली) निवड करण्यात आली. यामध्ये श्रेया तरस हिची देखील निवड झाली आहे. या संघात स्थान मिळवलेली श्रेया ही सर्वात कमी वयाची (१३ वर्षे ६ महिने) खेळाडू असून एस.बी. पाटील पब्लिक स्कूल मध्ये इयत्ता सातवी मध्ये शिकत आहे. पुढील काळात होणाऱ्या राष्ट्रीय शालेय क्रिकेट स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्यासाठी संधी मिळालेली एस. बी. पाटील पब्लिक स्कूल ची श्रेया ही पहिली राष्ट्रीय खेळाडू ठरली आहे.

प्राचार्या डॉ. बिंदू सैनी, उपप्राचार्या पद्मावती बंडा, मुख्याध्यापक शुभांगी कुलकर्णी, क्रीडा शिक्षक चंद्रकांत ठोंबरे यांचे तिला मार्गदर्शन मिळाले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी श्रेया तरस हिचे कौतुक केले पुढील राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



## मिशन PCMC : भाजपाकडून इच्छुक

# उमेदवारीसाठी 'रेकॉर्ड ब्रेक' नोंदणी!

### मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालियातून तीन दिवसांत 820 अर्जांचे वितरण

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकांचे बिगुल वाजताच भारतीय जनता पार्टीकडून उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुकांची अक्षरशः झुंबड उडाली आहे. पक्षाच्या मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयातून अवघ्या तीन दिवसांत 820 हून अधिक अर्जांचे वितरण करण्यात आले असून, उमेदवारीसाठी 'कमळ' हा पहिला पसंतीक्रम असल्याचे स्पष्ट झाले आहे.**




### शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांचा महापालिकेवर पुन्हा 'कमळ' फुलवण्याचा निर्धार

भाजपा नेते आणि राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी नुकत्याच पिंपळे सौदागर येथे झालेल्या आढावा बैठकीत, इच्छुकांनी कार्यालयातून अर्ज घेऊन त्यांची छाननी करून प्रदेश कार्यालयाकडे पाठवण्याच्या सूचना स्थानिक पदाधिकाऱ्यांना दिल्या होत्या. या सूचनेनंतर इच्छुक कार्यकर्त्यांमध्ये मोठी उत्सुकता पाहायला मिळाली. भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी इच्छुकांसाठी अर्जांचे विनामूल्य वितरण करण्याचा निर्णय घेतला. हा उपक्रम पक्षातील पारदर्शकता आणि शिस्तबद्ध प्रक्रियेचे उत्कृष्ट उदाहरण ठरल्याने इच्छुकांनी त्यांचे कौतुक केले. महामंत्री मधुकर ब. बच्चे यांनी सांगितले की, अर्ज वितरणाची संपूर्ण प्रक्रिया अत्यंत शिस्तबद्ध, पारदर्शक आणि सुगम झाली. "इच्छुकांचे सहकार्य आणि माझ्या सहकाऱ्यांची साथ मोलाची ठरली," असे ते म्हणाले.

**'अब की बार, 100 पार'चा नारा**

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत भाजपाने 'अब की बार, 100 पार' हा नारा दिला आहे. 32 प्रभागांमध्ये एकूण 128 जागा असून, त्यासाठी आरक्षणनिहाय अर्ज वितरण सुरू आहे. पक्षात शिस्त, संघटन आणि टीमवर्क या बळावरच भाजपाची कामगिरी ठळकपणे वाढत असल्याचे पक्ष पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि पक्षश्रेष्ठींचे निवडणुकीच्या कामकाजाकडे बारीक लक्ष

> "पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या विकासकामांमुळे आणि राष्ट्रहिताच्या निर्णयांमुळे लोकांचा भाजपावर अधिक विश्वास निर्माण झाला आहे. आमदार, माजी खासदार, वरिष्ठ नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते जोरदार तयारीला लागले आहेत. या निवडणुकीत आम्ही शंभर पार करणारच; महापौर हा भाजपाचाच असेल," असा ठाम विश्वास आहे.
> **-शत्रुघ्न काटे,** शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# मास्टर चॅम्प सिंगल कॅरम स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

### मास्टर माइंड ग्लोबल स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये आयोजित स्पर्धेत 160 हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मास्टर माइंड ग्लोबल स्कूल व ज्युनिअर कॉलेज भोसरी येथे मास्टर चॅम्प सिंगल कॅरम स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत एकूण १६० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्वक सहभाग नोंदविला प्रियदर्शनी स्कूल मॉडर्न हायस्कूल आर्यन वर्ल्ड स्कूल शिर्के स्कूल रत्नागिरी तसेच इतर अनेक शाळांमधील विद्यार्थी सहभागी झाले.**



कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. प्रदीपा नायर यांनी केले. स्पर्धेतील चॅम्पियन ऑफ द इयर हा मानाचा किताब मॉडर्न हायस्कूलने जिंकला तर मास्टर माइंड स्कूल चक्रपाणी यांनी सर्वाधिक विद्यार्थी सहभागी करून विशेष द्वितीय क्रमांक मिळवला.

कार्यक्रमाच्या शेवटी विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व ट्रॉफीद्वारे गौरविण्यात आले. शाळेच्या व्यवस्थापनाने या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगदान दिलेल्या खेळाच्या शिक्षिका प्रियंका पांचाळ इतर शिक्षक आणि पालकांचे आभार मानले.

# "स्वत:ला सिद्ध करण्यासाठी अचूक ज्ञान आत्मसात करा" : गणेश शिंदे

## प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या वतीने आयोजित 'प्रतिभा सृजन' व्याख्यानमाला




।पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड : युवकांनो, शिक्षणाचा आनंद घ्या. आजचे शिक्षणच उद्याचे भविष्य घडवते. स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी चिकित्सक अभ्यास आणि अचूक कौशल्य आत्मसात करणे अत्यावश्यक आहे," असे उद्गार व्याख्याते गणेश शिंदे यांनी व्यक्त केले.**

प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या वतीने आयोजित 'प्रतिभा सृजन' व्याख्यानमालेतील 'विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत पालक व शिक्षकांची भूमिका' या विषयावरील दुसऱ्या पुष्पात ते बोलत होते. विद्यार्थ्यांनी स्वतःचा विकास करण्यासाठी पुढील पाच ते दहा वर्षे पूर्णपणे शिक्षणाला वाहून घालावीत, अशी सूचना त्यांनी केली. आधुनिक तंत्रज्ञानामुळे जग आता एक खेडे झाले आहे. त्यामुळे कौशल्याधारित शिक्षण स्वीकारा. नाविन्याला घाबरू नका; काळानुसार स्वतःत बदल करा,"असेही त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले.

पाल क-शिक्षकांनाही मार्गदर्शन करताना शिंदे म्हणाले, "मुलांसोबत मोकळा संवाद ठेवा, प्रसंगी धाकही आवश्यक आहे. गुणपत्रिकेतील गुण म्हणजेच पालकांची गुणवत्ता नाही—मुलांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष द्या. शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यातील वेगळेपण ओळखून त्याला



अचूक मार्गदर्शन करावे."

कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे संस्थापक.सचिव डॉ. दीपक शाह यांनी व्याख्यात्यांचा शाल, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार केला. अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले, "विद्यार्थ्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी संस्था सातत्याने विविध उपक्रम राबवित आहे. वर्धापनदिनानिमित्त आयोजित तीन दिवसीय व्याख्यानमालेत तज्ज्ञांचे मार्गदर्शन हीच विद्यार्थ्यांसाठी मोठी शिदोरी आहे." कार्यक्रमाचे आयोजन प्रेरणादायी वातावरणात पार पडले. प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी, डॉ. वनिता कुऱ्हाडे, डॉ. पौर्णिमा कदम, एमबीए संचालक डॉ. सचिन बोरगांवे, मुख्याध्यापिका डॉ. वृंदा जोशी, प्रा. सुनिता फडके यांसह मोठ्या संख्येने पालक, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना बीएड प्राचार्या डॉ. पौर्णिमा कदम यांनी केली. पाहुण्यांचा परिचय डॉ. गीता कांबळे यांनी तर सूत्रसंचालन डॉ. सुवर्णा गायकवाड यांनी केले.




www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION OPEN
FOR THE YEAR 2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune